


पुणे : संचालक डॉ. आर. जी. सोमकुवार आणि डॉ. सुजॉय साहा यांच्या हस्ते शेतकऱ्यांना फवारणीसाठी उपयुक्त पीपीई किटचे वाटप करण्यात आले.

# राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्रात 'सुरक्षा हमेशा' प्रशिक्षण कार्यक्रम

**पुणे** : राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र पुणे व बीएएसएफ यांच्या सहकार्याने राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे येथे 'सुरक्षा हमेशा' हा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमातून शास्त्रज्ञ, शेतमजूर आणि फवारणी करणाऱ्या पुरुषांसाठी पीक संरक्षण उत्पादनांचा जबाबदार वापर आणि सुरक्षित शेती पद्धतींबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोमकुवर उपस्थित होते. यावेळी शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी बीएएसएफ ने केलेल्या प्रयत्नांचीही त्यांनी यावेळी प्रशंसा केली. या प्रसंगी राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुजॉय साहा, शास्त्रज्ञ डॉ. एन. ए. देशमुख यांनी सुरक्षित शेती पद्धतींचे महत्त्व विषद केले. पीक संरक्षण उत्पादनाच्या जबाबदार वापरावर तपशीलवार सादरीकरण 'बीएएसएफ'चे पीक विकास विशेषज्ञ डॉ. ओंकार गावकरे यांनी केले. फवारणीसाठीच्या वैयक्तिक संरक्षण उपकरणे (पीपीई कीट) संचालक डॉ. सोमकुवार आणि डॉ. साहा यांच्या हस्ते शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. बीएएसएफचे प्रशिक्षण व्यवस्थापक देवेंद्र व्यवहारे यांनी केले. कार्यक्रमाला सहभागी शेतकऱ्यांसह द्राक्ष संशोधन केंद्राचे कर्मचारी, सहायक कर्मचारी, कामगार उपस्थित होते.